
MODERN EDUCATION SOCIETY'S
DIA COLL GE O COMMER E, PUNE

लोकमत

# विद्यापीठ अन् संलग्नित महाविद्यालयाची माहिती शासनाच्या संकेतस्थळावर

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर: सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांची 'माहिती व्यवस्थापन प्रणाली' यासंबंधी शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची १०० टक्के माहिती शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर भरुन शासनाला सादर करण्यात आली आहे. वेळेत व व्यवस्थितरित्या माहिती सादर करण्यात आल्याने शासनाकडून विद्यापीठाचे कौतुक करण्यात आले.

सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांची माहिती शासनाला विविध शैक्षणिक बाबींच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. सोलापूर विद्यापीठातील सांख्यिकी विभागाने विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांची माहिती शासनाच्या वेबपोर्टलवर सादर करण्याकरिता विशेष प्रयत्न केले.



१०० टक्के माहिती संकेतस्थळावर सादर करण्यात आल्याने उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सोलापूर विद्यापीठास प्रशस्तीपत्र देऊन कौतुक केले.

नोडल अधिकारी तथा सहायक प्राध्यापक अशोक शिंदे आणि सांख्यिकी सहायक मुकतार शेख यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यामुळे कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र. कुलगुरू डॉ. एस. आय. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. बी. घुटे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पुढारी

# सोलापूर विद्यापीठाची माहिती शासनाच्या संकेतस्थळावर

## उच्च शिक्षण विभागाकडून झाले कौतुक



**सोलापूर : शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यापीठास प्रशस्तिपत्र देऊन सन्मान केला. यावेळी नोडल अधिकारी अशोक शिंदे आणि सांख्यिकी सहायक मुकतार शेख.**

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांची माहिती व्यवस्थापन प्रणाली याबाबतची शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची १०० टक्के माहिती शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर भरुन शासनाला सादर करण्यात आली आहे. वेळेत व व्यवस्थितरित्या माहिती सादर करण्यात आल्याने शासनाकडून विद्यापीठाचे कौतुक करण्यात आले आहे.

सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये यांची माहिती शासनाला विविध शैक्षणिक बाबींसंदर्भात निर्णय घेण्याकरिता अत्यंत आवश्यक व उपयुक्त आहे. सोलापूर विद्यापीठातील सांख्यिकी विभागाने विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांची माहिती शासनाच्या वेबपोर्टलवर सादर करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले आहे. १०० टक्के माहिती संकेतस्थळावर सादर करण्यात आल्याने उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सोलापूर विद्यापीठाचे प्रशस्तीपत्र देऊन कौतुक केले आहे. नोडल अधिकारी तथा सहाय्यक प्राध्यापक अशोक शिंदे आणि सांख्यिकी सहायक मुकतार शेख यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामुळे कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र. कुलगुरू डॉ. एस. आय. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. बी. घुटे यांनी आनंद व्यक्त केला आहे.